
# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Refereed Research Journal

Volume : [illegible] April-June 2017



ARTS | COMMERCE | SCIENCE | AGRICULTURE | EDUCATION | MANAGEMENT | MEDICAL | ENGINEERING & IT | LAW | SOCIAL SCIENCES | PHYSICAL EDUCATION | JOURNALISM | PHARMACY

Editor

**Sarkate Sadashiv Haribhau**

Email : powerofknowledge3@gmail.com, shsarkate@gmail.com

www.powerofknowledge.co.in

RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Refereed Research Journal

Editor
Dr. Sadashiv H. Sarkate

● Mailing Address ●
Dr. Sadashiv H. Sarkate
Editor POWER OF KNOWLEDGE
Head of Dept. Marathi
Art's & Science College, Shivajinagar, Gadhi, Tq. Georai Dist. Beed-431 143 (M.S.)
Cell. No. 9420029115 / 7875827115
Email : powerofknowledge3@gmail.com /
shsarkate@gmail.com
www.powerofknowledge.co.in

Price : Rs. 300/-
Annual Subscription: Rs. 2000/-

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | A Study of Human Development Index | Dr. V. S. Kshirsagar | १ |
| २ | ROLE OF ENTREPRENEURS IN THE BUSINESS | Dr. Subhash. K. Zinjurde | ४ |
| ३ | Advertisements Restore Values: A Case Study of Eight Television Advertisements in Indian Perspective | Mr.Sheshrao K. Rathod | ९ |
| ४ | A STUDY OF PRESENT SCENARIO OF GST | Dr. Atul H. Salunke | १९ |
| ५ | PROBLEM & POLICIES OF INDIAN AGRICULTURAL SECTOR | Dr. Subhash. K. Zinjurde | २५ |
| ६ | Government of Maharashtra and women empowerment with reference to Mahila ArthikVikasMahamandal (MAVM) | Mrs. Savita Bhausaheb Nage | ३० |
| ७ | 'ग्रामगीतामृतंम्' या ग्रंथातील विषय वैविध्य | सौ.अर्चना देवगिरीकर | ३३ |
| ८ | 'शिक्षाशास्त्राचा इतिहास व स्वरुप' | सौ.सुवर्णा कुलकर्णी | ३५ |
| ९ | महाभारतातील उपाख्याने | सौ.गार्गी पुरुषोत्तम व्यवहारे | ३८ |
| १० | नागनाथ कोत्तापल्ले यांच्या कथेतील समाजजीवन | प्रा.नाना झोडगे | ४० |
| ११ | काव्य हाच दलित साहित्याचा पहिला अविष्कार | प्रा.नामदेव शिनगारे | ४८ |
| १२ | भीमगीतांचा समाजजीवनावर झालेला परिणाम | प्रा.प्रताप गायकवाड<br>प्रा.डॉ.प्रभाकर कांबळे | ५२ |
| १३ | लोकसाहित्यातील विनोदाचा शोध | प्रा.अर्चना रामचंद्र चव्हाण | ५५ |
| १४ | मराठी विडंबन काव्य | प्रा.सुखदेव इघारे | ६० |
| १५ | केशव बा. वसेकरांचे ललित वाङ्मय - एक आकलन | प्रा.पसरकल्ले एस.पी. | ६५ |
| १६ | ग्रामीण कथेतून व्यक्त होणारे ग्रामजीवनाचे अंतरंग | प्रा. डॉ. संतोष विष्णू चतुर | ६८ |
| १७ | विमुक्तांच्या संवेदनेची कणव : केसूला | प्रा.व्ही.बी.राठोड | ७३ |
| १८ | भारतातील स्त्री पुरुष गुणोत्तरातील असमतोल एक समस्या विशेष संदर्भ महाराष्ट्र राज्य | सुधाकर श्रीराम हांगे<br>प्राचार्य डॉ. व्ही.जी. सानप | ८० |
| १९ | परिवर्तनाचे सृजन -अखंड | डॉ. रमेश विठ्ठलराव देवडे | ८५ |
| २० | मराठी आख्यायिकांचे स्वरुप व वेगळेपण | डॉ. शंताराम बबनराव चौधरी | ८९ |
| २१ | कृषी संस्कृतीतील स्त्री लोकगीते देशीयतेच्या पाऊलखुणा | डॉ. नानासाहेब पवार | ९५ |
| २२ | भारतीय जीवन में संस्कारों का स्थान | मनिषा राकेश कात्यायनी | १०१ |
| २३ | डॉ. जयंत विष्णु नार्लीकर की विज्ञानकथा धूमकेतु | डॉ. बी. आर. नळे | १०४ |
| २४ | राष्ट्रवाणी के संगाष्टी विशेषांक (आधुनिकता के संदर्भ में हिंदी साहित्य) | प्रकाश गायकवाड | १०८ |

# काव्य हाच दलित साहित्याचा पहिला अविष्कार

**प्रा.नामदेव शिनगारे**

महिला महाविद्यालय, गेवराई

'दलित' या संकल्पनेवर गेल्या अनेक वर्षापासून सतत चर्चा घडत आहे. पीडित, शोषक नाकारला गेलेला ज्ञान, मान, सत्ता, संस्कृती यापासून सतत जाणीवपूर्वक दूर ठेवलेला वर्ग तो 'दलित' असे म्हणावे लागेल. या दूर ठेवण्यामागे येथील व्यवस्थेचा दृष्टीकोन मूळातच धूर्त आणि मतलबी स्वरुपाचा होता.

'दलित' कोण ? असा प्रश्न विचारल्यानंतर असे लक्षात येते की, काही मान्यवर लेखकांच्या निवडक व्याख्या पाहिल्यानंतर असे लक्षात येते की, डॉ.म.ना.वानखडे, सदा कऱ्हाडे व बाबुराव बागूल यांच्या व्याख्या सर्वसमावेशक असून त्यांनी वर्गव्यवस्थेत अधिक, झुकते माप दिल्याचे दिसते, तर डॉ.गंगाधर पानतावणे, प्रा.केशव मेश्राम, प्रा.अरुण कांबळे यांनी प्रामुख्याने वर्णव्यवस्थेच्या संदर्भात विचार केल्याचे दिसते.

माझ्या मते वर्गव्यवस्थेचा विचार हा मार्क्सच्या विचाराकडे घेवून जातो, तर वर्णव्यवस्थेचा विचार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराशी मिळतो.

वरील दोन गटाबरोबरच अलीकडे तिसराही 'गट' आपणाला पाहावयास मिळतो. तो म्हणजे रावसाहेब कसबे प्रणित 'गट' त्यामध्ये प्रा.यशवंत मनोहर व बाबुराव बागूलही येतात. त्या गटाचे वैशिष्ट्ये म्हणजे मार्क्सवाद आणि आंबेडकरवाद या दोन विचारांना बरोबर घेवून जाणारा आहे. परंतु हे दोन विचार कधीच एकत्र येऊ शकत नाहीत. कारण मार्क्सचा विचार सशस्त्र क्रांतीचा प्रसंगी तलवार उपसण्यास सांगतो, तर आंबेडकरी विचारांचा मुळाशी बुध्दांचे तत्वज्ञान आहे, ते अहिंसेचे आणि शांतीचे.

**निष्कर्ष :-**

* मनुष्याचे कल्याण हेच दलित साहित्याचे मध्यवर्ती मूल्य आहे.
* बुध्दीप्रामान्यवादाचा पुरस्कार हाच बुध्दीप्रामान्यवादाचा गाभा आहे.
* दलित साहित्याची प्रेरणा आंबेडकरी विचार आहे.
* बाबासाहेबांचे विचार काव्याच्या माध्यमातून दलितांच्या झोपड्या झोपड्यात पोहोचले.
* काव्य हाच दलित साहित्याचा पहिला अविष्कार.

**दलित साहित्याच्या प्रेरणा :-**

दलित साहित्याच्या प्रेरणा, स्वरुप, प्रवृत्ती व प्रकृती मुळातच परस्पर भिन्न आहेत. या साहित्याने पारंपरिक वाङ्मयीन प्रवृतीला छेद देऊनच दलित साहित्याचा प्रवाह सुरु झाला.

**गौतम बुध्द :-**

ज्या बुध्दांनी कधी स्वर्ग मानिल नाही जातिभेद जाणिले नाही, कर्मकांडाला थारा दिला नाही, यज्ञ यागाला गौरविले नाही, पशूवधाला पाठींबा दिला नाही, मुर्ती पूजेला कधी प्राधान्य दिले नाही, विश्वाचा शास्ता कुणी 'परमेश्वर' मानिल नाही, तरीही विश्ववंद्य ठरलेल्या गौतम बुध्दास दलित साहित्यिकांनी आपल्या साहित्यातील सर्वकालीन विश्वप्रतिमा बनविली आहे. शोषित, पीडित, दलित माणसाला सर्वांगिन अध:पतनाच्या नरकातून सर्वप्रथम बुध्दानेच उठविले त्याला माणुसकीचे संस्कारमूल्य दिले. माणसाला आपला प्रज्ञा-मैत्री-प्रेम व करुणा हे क्रांतीच्या मानवतावादी धर्माचे केंद्र मानले. मनुष्य हेच मध्यवर्ती मूल्य मानले.

समता, बंधुता, न्याय व स्वातंत्र्य या सामाजिक लोकशाही मूल्यांचा स्विकार आणि विज्ञानाधिष्ठित बुध्दीप्रामान्याचा प्रजावंत प्रबुध्द बुध्दाने त्या काळात पुरस्कार केला. त्यामुळे बुध्द विचारास दलितजन आपल्या सांस्कृतिक साहित्यिक वाटचालीतला प्रेरणा देणारा एक मूल्य संस्कार मानतात.

**महात्मा फुले :-**

"विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
निती विना गती गेली, गती विना वित्त गेले,
वित्ता विना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले." १

अशाप्रकारे विद्येची महती सांगणारा, धर्मरुढी परंपरेतून दलित शूद्र व अतिशूद्र मनुष्याला अस्पृश्यतेच्या जोखडातून मुक्त करुन मानवजातीच्या उत्थानाचे स्वप्न साकार करु पाहणारा, बुध्दी प्रामान्यवादी व दूरदृष्टीचा महापुरुष म्हणजे महात्मा जोतिबा फुले होय.

म.फुले यांच्या चळवळीचे केंद्र 'माणूस' होते. त्यांनी जन्मभर शूद्र दलितांच्या उध्दारासाठी प्रतिगामी शक्तीशी लढा दिला. त्यांचे स्थान दलित मुक्तीच्या लढ्यात अविस्मरणीय आहे. म्हणून दलित साहित्याची म.फुले प्रेरणा शक्ती आहे, असे दलित साहित्यिक मानतात. हे खरेच आहे.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर :-**

गौतम बुध्द, मु.फुले यांना दलित साहित्याने तात्विक, वैचारिक पार्श्वभूमीच्या संदर्भात विचार करता दलित जीवनाची युगसापेक्ष प्रत्यक्ष मूल प्रेरणा दलित साहित्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनाच मानते.

डॉ.आंबेडकरांनी आपल्या जीवनातली सारी आग प्राशन केली. ते सुर्यासारखे प्रखर बनले. तेजस्वी अन् कणखर बनले. आणि माणसाला माणूस बनविण्यासाठी आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत प्राणपणाने लढत राहिले.

परंपरेच्या अवगुंठनात पडलेल्या, चक्रव्युहात सापडलेल्या गोंधळलेल्या माणसाला साऱ्या संभ्रमाचा, विपरीत संकल्पनाचा व्यूहभेद करुन उठण्याचा उत्थानाचा लढाऊ मार्ग दार्खविला. डॉ.आंबेडकरांनी मनुष्यापणा हे सर्वश्रेष्ठ मूल्य मानले दलितांची माणूस म्हणून अस्मिता चेतविली. त्यांनी बंधमुक्त केले 'मानमुक्ती' हे त्यांचे ध्येय होते.

'तू झालास परिस्थितीवर स्वार
आणि घडविला नवा इतिहास
तू झालास मूक समाजाचा नायक
आणि जागा केलास उभा बहिष्कृत भारत.

(ज.वि.पवार - नाकेबंदी प्र.क्र.१८)

दलित साहित्याची प्रेरणा आंबेडकरी विचार आहे. गौतम बुध्द, म.फुले यांच्या विचाराचे दलित साहित्याला अधिष्ठान लाभले आहे. आणि या विचारातूनच दलित साहित्य काव्य, कथा, कादंबरी, नाट्य, आत्मकथन इ.माध्यमातून अवतरत गेले.

**दलित काव्याची परंपरा :-**

पारंपारिक, साहित्यात जे जीवन उपेक्षित राहिले त्या 'दलित' जीवनाचे दलितांनी केलेले चित्रण ते दलित साहित्य 'दलित साहित्य' परंपरेचा धागा लांबवला तर तो महार संत कवी चोखामेळा यांच्या पर्यंत मागे घेऊन जाता येतो.

सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक परंपरेच्या अंधार कोठडीत चौफेर गुदमरलेले दलित जीवन त्यातून बाहेर पडण्यासाठी प्राचीन काळापासून धडपडत होते. त्या जीवनाला मुक्त अभिव्यक्ती हवी होती. मध्ययुगातील १३ व्या शतकातील

एक प्रांतभावाने अस्पृश्य संत कवी चोखोबा म्हणतात.

"हीन याती देवा .............. मज दूर दूर हो म्हणती ......" असं देवाला अळविणाऱ्या लाचार चोखोबांच्या वेदनेचा अंत:स्तर सामाजिक वेदनेचाच होता. परंतु चोखोबाला संस्कृति-परंपरेविरुध्द
झोंबणारा आवाज उठविता आला नव्हता. कर्ममेळ्याला मात्र बापाचे व समाजाचे लाचारपण कळलेले दिसते. ही सामाजिक जाणीव झाल्यामुळे तो आपल्या 'हीन याती' बदल असा जळजळीत सवाल करतो.

"आमुची केली हीन याती |
तुज का न कळे श्रीपती ||
जन्म गेला उष्टे खाता |
लाज नये तुमच्या चित्ता ?"२

त्यावेळी मात्र देवाची लाज काढणारा सामाजिक अन्यायाची जाणीव झालेला कर्ममेळा धीट वाटतो. परंतु असा क्वचित उठणारा आवाज ऐकणारा कोणी नव्हता. नव्हे भक्तीच्या गजरात तो कुणाला ऐकायला आला नसावा.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांमुळे दलित 'माणसात' आला. त्याच्या ठिकाणी आत्मसन्मान, आत्मविश्वास निर्माण झा. अस्पृश्य समाज जागा होऊ लागला. किसन फागू बंदसोड हा असाच एक जाग आलेला अस्वस्थ कवी ! त्याला वाटते की. हा देश माझा म्हणण्या इतके या देशाने आपल्याला काय दिले ? या देशात धर्माच्या नावाखाली माणसांचा छळ होतो. त्या धर्माविषयी प्रेम का वाटावे ? या समाज व्यवस्थेत त्यांनी का राहावे ? असा जेंव्हा कवील प्रश्न पडतो तेंव्हा आपली व्यथा वेदना कवितेतून तो व्यक्त करतो . किसन फागू अगतिकपणे देवाला अळवितात की,

'हरि ! मज पशू कर वा पक्षी कर
परि करु नको महार. ३

हे उद्‌गार वाचले की, अंत:करण पिळवटून जाते. किसन फागूच्या तुलनेत नाशिक जिल्ह्यातील, निफाड तालुक्यातील कारसूळ गावचे शाहीर घेंगडे यांची कविता अधिक प्रचारकी आहे. त्यांची कविता आवाहन प्रिय आहे. रुढी पंररपरेला तुडवून नव्या समाज रजनेसाठी ते सतत आवाहन करीत राहिले. बाबासाहेबांनी वतनदारी विरुध्द आवाज उठवल्यावर ते म्हणू लागतात.

'बरी नाही वतनदारी
शुध्द आहे गुलामगिरी
तिच्या पायी झालो भिकारी
विचार करा जरा अंतरी

आपला समाज विचार करुन पेटून उठावा म्हणून ते कवितेतून समाजाशी बोलत राहिले.

शाहीर घेंगडे यांच्याप्रमाणे वामनदादा कर्डकही आपली कविता घेऊन दलितांच्या झोपड्यातून गेले. त्यांची बाबासाहेबांच्या विचारावर असीम श्रध्दा आहे. त्यांचा नेतृत्वावर त्याचा विश्वास आहे. त्यांनी या दलित मनात जळजळीत अंगार पेटविला ते म्हणतात -

तुफानातले दिवे आम्ही तुफानातले दिवे
तुफानवारा पाऊसधारा मुळीन आम्हा शिवे.

त्यांची कविता म्हणजे त्यांच्या मनात ठसठसत असलेले दु:ख त्यांची कविता म्हणजे त्यांच्या संवेदनशील मनाचे आवेग ! ते म्हणतात.

"भीम माझ्यामध्ये होता. मान ताठ होती माझी

माझ्यातला भीम इथे, मीच केलाउणा, दोष देऊ कुणा?

वामनदादांच्या कवितेतील हे दु:ख बाबासाहेब निधन पावल्यानंतर दलित सामाजाला जाणवणाऱ्या पोरकेपणाचे आहे.

बाबासाहेब हयात होते तेंव्हा त्यांच्या विचाराचे लोण समाजात पोचवावे, मुक्ती लढ्यासाठी नवजागरण घडवून आणावे म्हणून किसन फागूजी, शाहीर घेंगडे, वामनदादा कर्डक, सोनुने, ना.रा.शेंडे, लखमापूरकर, मधु कोसारे इ.ची कविता धडपडत होती.

बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर जी परिस्थिती निर्माण झाली. त्यातून दलित कविता वणव्यासारखी जाळीत सुटली. नवी दलित कविता वेदना व्यक्त करीत करीत विद्रोहाच्या वाटेवर वेगाने पावले टाकू लागली. त्यामध्ये प्रामुख्याने नामदेव ढसाळ, दया पवार, बाबुराव बागूल, केशव मेश्राम, दामोधर मोरे, वामन निंबाळकर,यशवंत मनोहर, त्र्यंबक सपकाळे, अर्जून डांगळे, ज.वि.पवार, प्रल्हाद चेंदवणकर, प्रकाश जाधव, हिरा बनसोडे, ज्योती लांजेवार, बी.रंगराव, दामोदर मोरे अशा कितीतरी कविंची नावे सांगता येतील.

**संदर्भ :-**

१) कीर धनंजय, मालशे स.गं.फडके य.दी. - महात्मा फुले समग्र वाङ्मय.
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई. (पृ.क्र.२६३)

२) मेश्राम योगेंद्र - दलित साहित्य उद्गम आणि विकास - मंगेश प्रकाशन नागपूर (पृ.क्र.९४)

३) फडके भालचंद्र - दलित साहित्य वेदना व विद्रोह
श्री विद्या प्रकाशन, पुणे (पृ.क्र.११४)

४) रंगराव बी.मराठी दलित कविता - साहित्य अकादमी.

❖❖❖❖

Principal
J.B.S.P.M's Mahila College,
Tq. Georai, Dist. Beed.